RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग पाच

वर्ष १२, अंक १७] मंगळवार, जून २३, २०२६/आषाढ २, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ३९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानपरिषदेत दिनांक **२३ जून, २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक, महाराष्ट्र विधानपरिषद **नियम १११** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

L. C. BILL No. X OF 2026.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १०.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

२०१७ चा महा. ६.

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून त्यांनी

२०२६ चा महा. अध्या. ६.

दिनांक १६ जून २०२६ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १६ जून २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम १०९ मधील,— २०१७ चा महा. ६.

(१) पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) खंड (घ) मधील, दुसरे परंतुक वगळण्यात येईल;

(दोन) खंड (छ) मधील, विद्यमान दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, सन २०२६- २७ या शैक्षणिक वर्षासाठी, राज्य शासनास, ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अंतिम मान्यता देता येईल.";

(२) पोट-कलम (४) मध्ये, खंड (घ) मधील,—

(एक) दुसरे परंतुक व तक्ता वगळण्यात येईल;

(दोन) विद्यमान दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :-

"परंतु आणखी असे की, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी, राज्य शासनास, ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी देता येईल.".

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २०२६ चा महा. अध्या. ६.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम १०९ मध्ये, नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्याच्या कार्यपद्धतीची तरतूद केलेली आहे. उक्त कलम १०९ च्या पोट-कलम (३) च्या खंड (छ) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अंतिम मान्यता देता येईल आणि उक्त कलम १०९ च्या पोट-कलम (४) च्या खंड (घ) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, ज्या वर्षी परवानगी मागितली असेल, त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी देता येईल.

२. महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेमुळे उक्त कलम १०९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था, सुरू करण्याची आणि नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा किंवा अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्याची कार्यपद्धती पार पाडली जाऊ शकत नव्हती. म्हणून, उक्त कलम १०९ मध्ये सुयोग्य सुधारणा करून, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी आणि नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्यासाठी राज्य शासनाद्वारे अंतिम मान्यता किंवा परवानगी देण्याचा दिनांक वाढविणे इष्ट आहे, असे वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक १६ जून २०२६ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६ (२०२६ चा महा. अध्या. ६), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २२ जून, २०२६.

चंद्रकांत (दादा) पाटील,
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक २३ जून, २०२६.

डॉ. विलास आठवले,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.